माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ३०३/२०२२**

**अपिलार्थी, श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी,**
पंचायत समिती नागपूर, ता.जि. नागपूर

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी,**
पंचायत समिती नागपूर, ता.जि. नागपूर

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
ग्रामपंचायत पांजरी (बु.), ता.जि. नागपूर

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ११.०३.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित (प्रतिनिधी)**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २८.०९.२०२१ | ०४.१०.२०२१ (हस्तांतरीत) | २९.१०.२०२१ | २९.११.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २८.०९.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " वर्ष २०१८ ते आजपर्यंत विराजपार्क, ग्रामपंचायत पांजरी (बु.) ता.जि.नागपूर अंतर्गत शासनाच्या सर्व योजनेअंतर्गत विविध बांधकामाची तपासणी करुन विविध साहित्याच्या विहीत वारंवारीतानुसार वेळोवेळी घेण्यात आलेल्या चाचणी अहवालांची प्रत व केलेल्या विविध कामाचे फोटोची सत्यप्रत द्यावेत तसेच सर्व M.B. ची सत्यप्रत " इ. माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.१०.२०२१ रोजी श्री. पंखराज/श्री. तलमले, शाखा अभियंता, पंचायत समिती नागपूर यांचेकडे कलम ५(५) नुसार अर्ज हस्तांतरीत करुन माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी सहाय्य मागितलेले आहे व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे. त्यानुसार श्री. एम.आर. तलमले, शाखा अभियंता, पं.स. नागपूर यांनी दिनांक २५.१०.२०२१ रोजी श्री. राजेश ठाकूर यांनी मागितलेली संपुर्ण माहिती ही ग्रामपंचायत कार्यालय पांजरी (बु.) शी संबंधित असल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पं.स. नागपूर यांना सुचीत केले आहे. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पं.स. नागपूर यांनी दिनांक ०२.११.२०२१ रोजी जन माहिती

अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत पांजरी (बु) यांचेकडे माहिती अर्ज कलम ६(३) नुसार हस्तांतरीत केला आहे व त्याची प्रतिलिपी अपिलार्थीस दिलेली आहे.

तत्पूर्वीच अपिलार्थी यांनी **दिनांक २९.१०.२०२१ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहितीचा अधिकार कायद्यानुसार विहीत मुदतीत व आजपर्यंत माहिती दिलेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. सदर प्रथम अपील अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७.१२.२०२१ रोजी सुनावणी आयोजित केल्याचे आढळून येते. परंतु प्रत्यक्षात सुनावणी घेवून आदेश पारीत केल्याचे आढळून येत नाही.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०३.०२.२०२२ रोजी** " प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून आदेश पारीत केले नाही " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दिनांक ०३.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दिनांक ११.०३.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, श्री. अशोक मते उपस्थित आहेत. तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे जन माहिती अधिकारी श्री. अशोक मते उपस्थित आहेत.

आज झालेल्या सुनावणीत प्राधिकरणाच्या वतीने खुलासा सादर केलेला आहे. त्यात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०४.१०.२०२१ रोजी कलम ५(५) नुसार मानिव जन माहिती अधिकारी श्री. पंखराज/श्री. तलमले, शाखा अभियंता, पंचायत समिती नागपूर यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अर्ज हस्तांतरीत केला असता, त्यांचेकडून दिनांक २५.१०.२०२१ रोजी श्री. राजेश ठाकूर यांनी मागितलेली संपुर्ण माहिती ही ग्रामपंचायत कार्यालय पांजरी (बु.) शी संबंधित असल्याचे सुचीत केले आहे. त्यानुसार सदर माहिती अर्ज कलम ६(३) नुसार ग्रामपंचायत कार्यालय पांजरी (बु.) यांचेकडे दिनांक ०२.११.२०२१ रोजी हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. तसेच अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र-ब च्या अनुषंगाने दिनांक १७.१२.२०२१ रोजी सुनावणी देखील आयोजित करण्यात आली असल्याचे पत्र सादर केल्याचे आढळून येते. मात्र प्रत्यक्षात सुनावणी घेण्यात आलेली नाही. ही बाब लक्षात घेता, अपिलार्थी यांचा व्दितीय अपील अर्ज अंशत: मंजूर करीत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत पांजरी (बु.) यांनी विराजपार्क, ग्रामपंचायत पांजरी (बु.) ता.जि.नागपूर अंतर्गत राबविण्यात आलेल्या शासकीय योजना, त्यासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी व त्याचा करण्यात आलेला विनियोग याबाबतची सन २०१८ पासून ते माहिती देण्याच्या दिनांकापर्यंतची संपुर्ण माहिती ही अपिलार्थी यांना तात्काळ व विनामुलय प्रदान करण्यात यावी. खर तर सदर माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४(१) अन्वये ग्रामपंचायतच्या दर्शनी भागात उघड करणे अपेक्षित आहे. याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने **Kishan Chand Jain Vs. Union Of India मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, या प्रकरणात दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कलम ४ अन्वये सर्व सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांच्या कार्यालयातील माहिती ही स्वंयप्रेरणेने उघड करण्याबाबत सुचीत केले आहे.**

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती ही शासकीय योजना, त्यासाठी शासनाकडून प्राप्त झालेला निधी व त्याचा विनियोग याचेशी संबंधित असून सदर माहिती तात्काळ अपिलार्थीस विनामुल्य प्रदान करावी. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत पांजरी (बु.) यांना दिनांक ०२.११.२०२१ रोजीचे पत्र प्राप्त झाले नसल्याचे नमूद केले आहे. विद्यमान जन माहितो अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पं.स. नागपूर यांनी वरील पत्र हे कार्यालयातून निर्गमित झाले असल्याचे नमूद केले असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत पांजरी (बु.) यांनी विहीत मुदतीत अपिलार्थीस माहिती प्रदान न केल्याचे प्रथमदर्शनी आढळून येते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम १९(८)(ग) व २०(१) नुसार त्यांचेविरुध्द अधिकतम शास्तीची कार्यवाही का करण्यात येवू नये, यांचा स्वंयस्पष्ट लेखी खुलासा त्यांनी दिनांक १५.०७.२०२४ रोजी आयोगास व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत पांजरी (बु.) यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी. सदर खुलासा सादर करण्याची अंतिम संधी कलम २०(१) नुसार नैसर्गिक न्याय तत्वास अनुसरुन देण्यात येत आहे. उपरोक्त खुलासा सादर न केल्यास एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेवून आदेश पारीत केलेले नाही. त्यामुळे त्यांचेवर सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन दिनांक १० जून, २००८ रोजीचे परिपत्रक व क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६ मंत्रालय मुंबई दि. ३१ मार्च २००८ च्या परिपत्रकानूसार तसेच कलम १९ (८) (ग) व २० (२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करण्यात येवू नये? याचा स्वंयस्पष्ट लेखी खुलासा त्यांनी दिनांक १५.०७.२०२४ रोजी आयोगास व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. सदर आदेशाची प्रत तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांना पोहचेल, याबाबतची विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी खातरजमा करावी.

**अंतरिम आदेश**

उपरोक्त आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत पांजरी (बु.) व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा स्वंयस्पष्ट खुलासा दिनांक १५.०७.२०२४ रोजी आयोगास व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावा. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्याची पोहच दिनांक १५.०७.२०२४ रोजी आयोगास व्यक्तीश: उपस्थित राहून सादर करावी.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन ★ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक : ११.०३.२०२४

जावक क्रमांक 3336 दिनांक 31 MAY 2024